DAY — 10 SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | II | 24 | 1100 | J-322 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# CHILD DEVELOPMENT (43)

**Time : 3 Hrs.** **(7 Pages)** **Max. Marks : 70**

**सूचना :** *(१) सर्व कार्यकृती सोडवणे अनिवार्य आहे.*

*(२) आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व आकृतीला नावे द्या.*

*(३) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.*

**प्र. १. (अ)** खालील पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पुन्हा लिहा : (६) **[१८]**

(१) जन्मापासून व्यक्तिंमधील बंदिस्त असलेली गुणवैशिष्ट्ये मोकळी होत जाणे या प्रक्रियेला ----- म्हणतात.

(अ) अध्ययन (ब) परिपक्वता

(क) शिकवण्यायोग्य क्षण

(२) प्रेम व वात्सल्य ही बालकांची ----- गरज आहे.

(अ) मानसिक-सामाजिक (ब) शारीरिक

(क) तार्किक

(३) वयाच्या ----- वर्षानंतर, बालकाचे दुधाचे (अस्थायी) दात पडून कायमस्वरूपी दात येतात.

(अ) ४ (ब) ५

(क) ६

(४) सर्वात पहिले बालसंगोपन केंद्र १८४० साली ----- येथे स्थापन झाले.

(अ) फ्रान्स (ब) स्वीडन

(क) अमेरिका

(५) ------- बालकांमध्ये जन्मत:च सापडणारे एक व्यंग आहे.

(अ) खुरटे पाय (ब) स्नायू बारीक होऊन नष्ट होणे

(क) फाटलेला ओठ

(६) ज्या कृतीत क्रियाशील सहभाग नसतो, त्याला ----- खेळ म्हणतात.

(अ) मुक्त (ब) अक्रियाशील

(क) क्रियाशील

**(ब)** खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा : (६)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) प्रश्न वय | (१) मारणे, लाथ मारणे, श्वास / दम कोंडणे |
| (ब) स्नायूप्रधान | (२) खुरटा पाय |
| (क) आक्रस्ताळेपणा | (३) खेळाद्वारे शिक्षण पद्धतीचा बालशिक्षणात वापर |
| (ड) अस्थिअक्षमता | (४) पूर्व बाल्यावस्था |
| (इ) रूसो | (५) वाढीवर नियंत्रण |
| (फ) कंठस्थ ग्रंथी | (६) स्नायू युक्त शरीर |
| | (७) मेदयुक्त शरीर |

**(क)** खालील प्रश्न सूचनेप्रमाणे सोडवा : (६)

(१) पुढील विधान वाचा व विकासाच्या कोणत्या क्षेत्राशी निगडित आहे ते लिहा.

नर्सरीच्या वर्गातील बालके रांगणे, चालणे, उड्या मारणे, आणि चढणे यासारख्या नैसर्गिक कृती करतात.

(२) संकेताच्या आधारे उलट-सुलट दिलेल्या शब्दांपासून योग्य मांडणी करून शब्द लिहा.

मेंदूचे बाह्यावरण दोन ----- पासून बनलेले असते. (लर्धअगो)

(३) खालील चित्रात संधारणाचा कोणता प्रकार दिसून येतो :



(४) रिकामे चौकोन पूर्ण करा :

बालकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्ने | | सं | | | न |

(५) बुद्ध्यांकाचे मापनाचे सूत्र लिहा.

(६) खालील वाक्यावरून खेळाचा कोणता प्रकार आहे? ते ओळखा:

रिकामी खोकी, कागदाच्या प्लेट पासून लांब ट्रक आणि त्याची चाके तयार करू शकतात.

**प्र. २.** **(अ)** खालील प्रश्नांपैकी कोणतेही सहा प्रश्न सोडवा : (१२) **[१६]**

(१) पुढील विधान बरोबर की चूक ते सकारण लिहा.

वाढ म्हणजेच संख्यात्मक बदल.

(२) प्रभावी व अप्रभावी वंशाणू / जनुके म्हणजे काय?

(३) स्थूल कारक कौशल्ये म्हणजे काय? उदाहरण द्या.

(४) भावनांचे प्रकार सांगून प्रत्येकी उदाहरण द्या.

(५) नाट्यात्मक खेळांची वैशिष्ट्ये लिहा.

(६) बाहुलीनाट्य म्हणजे काय?

(७) बरोबर उत्तरासाठी अक्षरांची उलटापालट करा.

(अ) संदर्भ : बालकांना विज्ञान शिकवू नये ते मिळवावे.

शब्द : धा शो तू न

(ब) संदर्भ : रुसो यांचे प्रसिद्ध पुस्तक

शब्द : मि ए ल

**(ब)** खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : (४)

(१) संज्ञा स्पष्ट करा – कुपोषण

(२) विकासाच्या अवस्थांची यादी तयार करा.

(३) क्रियाशील खेळ व अक्रियाशील खेळ फरक स्पष्ट करा.

**प्र. ३.** **(अ)** खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा : **( १२ )[१८ ]**

(१) खालील गरजांचे शारीरिक आणि मानसिक सामाजिक गरजांमध्ये वर्गीकरण करा.

स्वीकृती, भूक, निवारा, प्रेम व वात्सल्य, वस्त्र, समवयस्क गट, तहान, झोप, विश्रांती, आरोग्य

(२) वाचन अक्षमतेची वैशिष्ट्ये लिहा.

(३) खालील तत्त्ववेत्त्याचे चित्र ओळखा व त्यांचे शिक्षणविचार सांगा.



(४) लाजाळूपणाची कारणे स्पष्ट करा. (कोणतेही तीन)

(५) शिस्तीची तंत्रे कोणती? कोणतेही एक स्पष्ट करा.

**(ब)** खालील विषयांवर संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही दोन) : (६)

(१) संवेदन

(२) पालक-शाळा सहयोगाचे महत्त्व

(३) किंडरगार्टन शाळेची उद्दिष्ट्ये

**प्र. ४. खालील प्रश्न दिलेल्या सूचनेप्रमाणे सोडवा :** **[१८]**

('अ'मधील १, 'ब'मधील १ व 'क'मधील १ असे एकूण तीन प्रश्न सोडवा)

**( अ )** बालकांच्या विकासाची अंगे स्पष्ट करा. (६)

**किंवा**

पूर्वबाल्यावस्थेतील शारीरिक विकासाचे कोणतेही तीन पैलू स्पष्ट करा.

**( ब )** सामाजीकरणाचे वर्तन प्रकार स्पष्ट करा. (कोणतेही तीन) (६)

**किंवा**

खेळाची व्याख्या देऊन खेळाची गरज दर्शविणारे निर्देशक स्पष्ट करा.

**( क )** संक्रियापूर्व अवस्थेतील बालकांची कोणतीही तीन वैशिष्ट्ये स्पष्ट करा. (६)

**किंवा**

खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा :

बालकाला स्वत:च्या घरी नवीन खेळण्याच्या तुलनेत स्मार्टफोन, लॅपटॉप, आईपॅड सहज उपलब्ध होतो. तर्कसंगत निर्णय घेण्याएवढे बालकाचे वय झालेले नसते. त्यामुळे त्यांना सहज व्यसन लागू शकते. सर्वसाधारणपणे नोकरी करणारे पालक सुरक्षिततेच्या आणि संरक्षणाच्या कारणासाठी बालकांना स्मार्टफोन देतात. ज्या बालकांना स्मार्टफोनचे व्यसन जडते त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासात समस्या आलेल्या दिसून येतात.

मानसिक विकासासंबंधीच्या समस्या म्हणजे मानसिक अस्थिरता, एकाग्रता नसणे, नैराश्य, राग आणि नियंत्रणात कमतरता तर शारीरिक समस्या म्हणजे दृष्टी आणि श्राव्य दोष, स्थूलपणा, शरीरात समतोल नसणे, मेंदू विकासात कमतरता यांचा समावेश होतो.

संपूर्ण आयुष्यात जर स्मार्टफोनचे व्यसन कायम राहिले तर बालकाचे वैयक्तिक आणि सामाजिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे पालक आणि समाजाने हे व्यसन मुलांना जडू नये म्हणून प्रतिबंधक उपाय करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

(१) बालकांना स्मार्टफोनचे व्यसन सहजपणे लागण्याची कारणे कोणती? (१)

(२) नोकरी करणारे पालक बालकांना कोणकोणत्या कारणासाठी स्मार्टफोन देतात? (१)

(३) स्मार्टफोनच्या व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक समस्या कोणत्या? (२)

(४) स्मार्टफोनचे व्यसन हाताळण्यासाठी काय कराल? (२)

◆◆◆